## राष्ट्रहिताच्या नजरेतून

शेखर गुप्ता

# युद्धात आकडे नव्हे; तर रणनीती महत्त्वाची!



**भारतीय हवाई दल आणि पाकिस्तानी हवाई दल या दोघांनीही मे महिन्यातील ८७ तासांच्या युद्धात एकमेकांची विमाने पाडल्याचा अधिकृत दावा केला आहे. यातून मोठा प्रश्न उपस्थित होतो की, खरेच या आकड्यांशी कोणाला देणेघेणे आहे का?**



भारत आणि पाकिस्तानच्या हवाई दलांनी मे महिन्यातील हवाई युद्धाबाबत केलेल्या दाव्याबाबत आपण काही मुद्दे अधिक विस्तृतपणे मांडणार आहोत. हे आकडे खरेच महत्त्वाचे आहेत का? त्यांचा अर्थ काय आहे? हे जाणून घेणार आहोत. याची सुरुवात एका गोंधळात टाकणाऱ्या प्रश्नाने करणार आहे. युद्धामध्ये एका बाजूची १३ विमाने आणि दुसऱ्या बाजूची पाच विमाने नष्ट झाली, तर यात जिंकले कोण?

जेव्हा शरणागती किंवा मोठ्या प्रमाणावर सैन्य माघार घेत नाही, अशावेळी दोन्ही बाजूंना विजयाचा दावा करता येतो. काही परिस्थितींमध्ये याबाबत स्पष्टता असते. भारतीय आपणच सर्व युद्ध आणि संघर्ष जिंकल्याचे मानतात, पण १९६२मध्ये चीनविरोधातील युद्ध हरल्याचे आपण स्वीकारतो. त्याचप्रमाणे १९७१मध्ये पाकिस्तान त्यांचा पराभव मान्य करतो.

पाकिस्तानचे लेफ्टनंट जनरल ए. ए. के. नियाझी यांनी १६ डिसेंबर १९७१मध्ये शरणागतीच्या दस्तावेजावर स्वाक्षरी केली होती. त्या वेळी त्यांच्यासमोर बाजूला भारताचे लेफ्टनंट जनरल जगजितसिंग अरोरा बसले होते. तेव्हा प्रश्न असा पडतो की, पूर्व विभागातील युद्धात कोणत्या हवाई दलाने १९७१मध्ये किती विमाने गमावली? याचे उत्तर आहे भारताने १३, तर पाकिस्तानची पाच विमाने. या विमानांच्या टेल क्रमांक आणि वैमानिकांच्या नावासहित ही माहिती असून, विरोधी इतिहासकारही हे आकडे मान्य करतात. युद्धात पाडण्यात आलेली ही विमाने आहेत. यात अपघात किंवा पाकिस्तानी वैमानिकांनी युद्धभूमीवर सोडून दिलेली विमाने नाहीत. पुन्हा हाच प्रश्न पडतो की, पाकिस्तानच्या तुलनेत भारतीय हवाई दलाची तीनपट जास्त विमाने नष्ट झाली होती, मग हे युद्ध जिंकले कोण? त्याचे उत्तर भारतीय हवाई दलाने ही १३ विमाने कशी गमावली? या प्रश्नात आहे. यातील दोन विमाने हवाई चकमकीत पडण्यात आली, तर इतर जमिनीवरून केलेल्या माऱ्यात नष्ट झाली. पाकची पाचही विमाने हवाई चकमकीत पाडण्यात आली. सर्व पाकिस्तानी वैमानिक हे त्यांची विमाने सोडून पळून गेले. पाकिस्तानी हवाई दलाचा पराभव होऊनही भारतीय हवाई दलासाठी युद्ध संपले नव्हते. त्यांनी विजय लवकर व्हावा आणि जमिनीवरील सैन्याची कमीत कमी जीवितहानी व्हावी, यासाठी मदत आणखी वाढवली. यासाठी त्यांनी अधिक जोखीम पत्करली.

भारताची १३ पैकी ११ विमाने ही प्रतिस्पर्ध्याने जमिनीवरून केलेल्या माऱ्यात पाडण्यात आली. कमी उंचीवर असलेल्या या विमानांना लक्ष्य करण्यात आले. दोन्ही हवाई दलांमधील हा मुख्य फरक आहे. एक पक्ष बचावात्मक पवित्र्यात होता, तर दुसरा व्यापक राष्ट्रहितासाठी अधिक आक्रमक झाला होता. याबाबत 'तुम्ही युद्धभूमीत उतरता तेव्हा नुकसान हे होणारच' हे एअर मार्शल ए. के. भारती यांचे वाक्य अधिक सुस्पष्ट आहे.

पाकिस्तानी हवाई दल आणि त्यांच्या जनतेची मते सारखीच आहेत. त्यांना केवळ आपण किती विमाने पाडली हेच महत्त्वाचे आहे. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तानमध्ये झालेल्या जनमत चाचण्यांनुसारही ९६ टक्के लोक त्यांचाच विजय झाल्याचे मानतात. लष्करप्रमुखांना हास्यास्पदरीत्या पाचव्या स्टारने गौरवण्यात आले.

पाकिस्तानी हवाई दल हे अतिबचावात्मक मुष्टियोद्ध्यासारखे आहे. जो आपला चेहरा ग्लोव्हज्‌ने झाकून प्रतिस्पर्ध्याच्या हल्ल्याची वाट पाहत ठोसा मारण्याची संधी शोधत राहतो. त्याच्या अगदी उलट भारतीय हवाई दल ठोसा लागण्याची भीती न बाळगता प्रतिस्पर्ध्यावर तुटून पडतो. सुरुवातीला किंमत मोजावी लागत असली तरी अंतिम विजय हा भारताचा होतो.

भारतीय हवाई दलाच्या बेधडक आक्रमणाविरोधात पाकिस्तानी हवाई दल नेहमीच बचावत्मक पवित्रा घेतो, हे ऐतिहासिक सत्य आहे. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर ते पुन्हा अधोरेखित झाले आहे. दीर्घकाळ चाललेले युद्ध असो वा मर्यादित; हवाई दल, लष्कर आणि नौदल केवळ त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांशी लढत नसतात. मुख्य बाब ही आहे की, तुमच्या देशाचे लक्ष्य काय आहे आणि ते गाठण्यासाठी आपल्या सैन्य दलांना तेवढे सक्षम करण्यात आले आहे का?

भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'चे तीन प्रमुख लक्ष्य होते. पहिले, लाहोरजवळ मुरिदके येथील 'लष्कर ए तैय्यबा'चे आणि बहावलपूरचे 'जैश ए मोहम्मद'चे मुख्यालय उद्‌ध्वस्त करण्याचे. पाकिस्तानी दलांनी हल्ला केला तर तो ताकदीने परतवून लावण्याचे दुसरे लक्ष्य होते. तिसरे लक्ष्य होते, ते म्हणजे पाकिस्तानी सैन्य मागे हटले नाही तर त्यांच्यावर प्रतिहल्ला चढवणे. हे तिन्ही लक्ष्य गाठण्यात भारतीय सैन्य दले यशस्वी झाली. सुरुवातीला काही प्रमाणात नुकसान झाल्याचे अनेक लष्करी नेतृत्वांनी नमूद केले आहे. पहिल्या आणि तिसऱ्या लक्ष्यप्राप्तीबाबत त्यांच्याकडे पुरावे म्हणून छायाचित्रे आणि स्थानिक व्हिडिओ उपलब्ध आहेत. पाकिस्तानी कितीही विजयाच्या बाता मारत असले तरी १५ दिवसांपूर्वी इशारा देऊनही ते आपली ठिकाणे भारतीय हवाई दलाच्या हल्ल्यांपासून वाचवू शकले नाहीत, हे सत्य आहे. हे हल्ले रोखणे सोडाच, पण त्यात साधा अडथळाही आणू शकले नाहीत. ८ मे रोजी केलेल्या हारोप/हार्पी ड्रोनच्या हल्ल्यापासून अनेक महत्त्वाचे हवाईतळ आणि 'एसएएम' यंत्रणेचे रक्षण करण्यात अपयशी ठरले. या वेळी त्यांची हवाई संरक्षण यंत्रणा जोखीम टाळण्यासाठी बंद करून ठेवण्यात आली होती. जणू ही यंत्रणाच १० मे रोजी बंकरमध्ये निद्राधीन झाली होती. भारताच्या हवाई क्षेपणास्त्र हल्ल्यात हवाईतळ, हवाई संरक्षण स्थळे आणि शस्त्रास्त्र आगारे उद्‌ध्वस्त होत असताना प्रतिहल्ल्यासाठी पाकिस्तानी हवाई दल पुढे आलेच नाही. हे हल्ले आणखी एक दिवस सुरू राहिले असते, तर सिंधूच्या पश्चिमेकडील सर्व अड्डे उद्‌ध्वस्त झाले असते. पाकिस्तान या युद्धात कुठेच नव्हते.

खरेतर पाकिस्तानी हवाई दलाने एकदा आक्रमक पवित्रा घेतला होता. आदमपूर येथील एस-४०० रडारला लक्ष्य करण्यासाठी दोन जेएफ १७ विमानांतून चिनी बनावटीची सीएम४०० एकेजी ही अँटी-रॅडिएशन क्षेपणास्त्र डागली. हा सर्वात मोठा हल्ला होता; मात्र भारतीय हवाई दलाने तो हाणून पाडला. अशा वेळी धाडसी, आक्रमक आणि जोखीम घेण्यास तयार असलेल्या हवाई दलाने सुरक्षा कवच भेदण्यासाठी अनेक विमानांच्या सहाय्याने एकामागोमाग हल्ले केले असते; पण अशी जोखीम घेण्याची हिंमतच पाकिस्तानी हवाई दलात नव्हती.

देशाचा युद्धात पराभव झाला तरी पाकिस्तानी हवाई दल युद्धात किती विमाने पाडली हे दाखवून विजयाचा दावा करत आला आहे. आपण हे १९६५ आणि १९७१च्या युद्धातही पाहिले आणि 'बालाकोट'च्या संघर्षानंतरही. ऑपरेशन सिंदूरने दोन गोष्टी अधोरेखित केल्या आहेत. प्रथम भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्ध कमीत कमी काळ चालेल हा कटाक्ष होता आणि झालेही तसेच. हे युद्ध अंदाजे ८७ तास चालले. भारतीय हवाई दल या कारवाईत केंद्रस्थानी होते. दुसरे म्हणजे व्यापक राष्ट्रीय प्रयत्नांत त्यांचा हातभार ठळकपणे दिसला. दुसरीकडे पाकिस्तानी हवाई दलाने तीन महिने उलटले तरी आपल्या दाव्यांची पुष्टी करणारे कोणतेही पुरावे किंवा छायाचित्रे दिलेली नाहीत. व्यावसायिक उपग्रहांच्या तीक्ष्ण नजरेतून काहीही लपून राहिलेले नाही. पक्षपाती पाकिस्तानी नजरेतून ही छायाचित्रे कशी सुटू शकतात? पुरावे न देताच पाकिस्तान विजयाचा जल्लोष करत आहे. त्यांची मुख्य प्रवाहातील माध्यमे आणि समाजमाध्यमे, सर्व पक्षीय राजकीय नेते, आजी-माजी लष्करी अधिकारी हे सर्वच शानदार विजयाचा जल्लोष करत आहेत. काही जण तर १९७१चा सूड घेतल्याच्या उत्साहाच्या भरात दावा करत सुटले आहेत आणि स्वत:ला बढती, पदके आणि सन्मान प्रदान करत आहेत. पाकिस्तानात हीच सार्वत्रिक भावना आहे. तथ्य मात्र फार वेगळे आहे. भारतीय हवाई दलाने केलेल्या प्रतिहल्ल्यात सिंधू नदीच्या पूर्वेकडील आणि काही पश्चिमेकडील हवाईतळ उद्‌ध्वस्त करून 'ऑपरेशन बुन्यान अल मरसूस'ची हवा काढली होती, हे कसे विसरता येईल?

पाकिस्तानी हवाई दलाच्या प्रवक्त्याने पुष्टी केल्याप्रमाणे भारताने सर्व क्षेपणास्त्रे हवेतून डागली. भारतीय हवाई दलाने पाकिस्तानच्या हवाईतळांना आरामात लक्ष्य केले; कारण पाकिस्तानी हवाई दलाने कधीच आपले तळ वाचवण्याचा प्रयत्नच केला नाही. त्यांनी जोखीम न घेण्याची त्यांची शैली इथे पुन्हा सिद्ध केली. विशेष म्हणजे त्यांची संपूर्ण हवाई सुरक्षा यंत्रणाच निद्रिस्त झाली होती.

ऐतिहासिक आकडेवारीवर नजर टाकल्यास प्रत्येक वेळी भारताने युद्धात पाकिस्तानपेक्षा जास्त विमाने गमावली. असे असले तरी पाकिस्तानविरोधातील प्रत्येक युद्ध भारतानेच जिंकले आहे; मात्र १९६५चे युद्धही आपणच जिंकलो, असेच पाकिस्तानी मानतात. माझे मत विचाराल तर हे युद्ध अनिर्णित राहिले. हार-जीत ठरवावीच लागली, तर पाकिस्तानचाच पराभव झाला होता, कारण अनेक महिने योजना आखून त्यांनी हे युद्ध सुरू केले होते. त्यामुळे त्यांच्याकडे लक्ष्य होते. दुसरीकडे चीनसोबतचे युद्ध हरल्यामुळे भारतासाठी हा संक्रमण काळ होता. त्यामुळे काश्मीरवर ताबा मिळवण्यासाठी हीच संधी असल्याचे पाकिस्तान मानत होते. ही पहिली आणि शेवटची संधी त्यांनी गमावली. तार्कशुद्ध विचार करणारे पाकिस्तानी एक प्रश्न विचारतात की, पाकिस्तानी हवाई दल एवढेच शक्तिशाली आहे, तर मग पाकिस्तानला युद्धात विजय का मिळाला नाही, हा प्रश्न अंतर्मुख करणारा आहे. पाकने राष्ट्रहितासाठी जोखीम घेऊन बाजी उलटवल्याचे एकही उदाहरण इतिहासात सापडत नाही.

कोणी किती विमाने पाडली, यापेक्षा युद्धाच्या मोठ्या राष्ट्रीय प्रयत्नांमध्ये हवाई दलाची भूमिका काय होती, हे महत्त्वाचे आहे. १९७१मध्ये तिसऱ्या दिवसापर्यंत पाकिस्तानने आधीच १२० भारतीय हवाई दलाची विमाने पाडल्याचा दावा केला होता. 'डॉन'मध्ये ५ डिसेंबरच्या सकाळी छापलेला तो भलामोठा मथळा त्याचा पुरावा आहे. दोन्ही मोठ्या युद्धांत पाकिस्तानी हवाई दलाची उपस्थिती होती, पण त्याचा उल्लेखनीय परिणाम दिसून आलेला नाही. त्यांचे हवाई वर्चस्वाचे दावे केवळ स्वतःच्या हवाई हद्दीपुरतेच मर्यादित राहिले. कोणताही लष्करी इतिहासकार सांगेल, की ते खरे वर्चस्व अजिबात नाही.

सैन्य दले पारंपरिक असतात आणि पिढ्यान्‌पिढ्या आपली ठरलेली धोरणे बदलायला तयार नसतात. ऑपरेशन सिंदूरमध्ये आपण हेच पाकिस्तानी हवाई दलाकडून पाहिले. भारतीय हवाई दलाने त्यांच्यावर दबाव आणल्यावर त्यांनी जुन्या पद्धतीनेच माघार घेतली. परिणामी, पाकिस्तानी हवाई दल फक्त काही विमाने पाडण्याच्या, आकडे फुगवण्याच्या आणि युद्धाच्या शेवटच्या निकालापासून वेगळे होऊन त्यातच आनंद मानण्याच्या बालिश कल्पनेत समाधान मानत आले आहे. भारतीय हवाई दल मात्र नेहमीच विजयाच्या बाजूला राहिले आहे, हे ऐतिहासिक सत्य.

**अनुवाद : स्वप्नील पेडणेकर**

---

## राजधानी मुंबई

# चाळींकडून सदनिकांकडे

**झोपडपट्टी आणि चाळींच्या कोंदट वातावरणात जगणाऱ्या लाखो मुंबईकरांना त्यांच्या हक्काचा निवारा देताना जमीन, प्रकाश आणि आकाश मिळावे, हीच किमान अपेक्षा असते. शहर नियोजन आणि विकास म्हणजे सिमेंटची उभी जंगले नव्हेत, याचा विचार होण्याची आवश्यकता आहे.**

**दीपा कदम**





मुंबई शहराच्या इतिहासात १४ ऑगस्ट हा संस्मरणीय दिवस ठरला. मुंबईतील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यात वरळी येथील ५४६ सदनिकाधारकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चाव्यांचे वाटप केले. अनेक वर्षे चाळीतील १६० चौरस फुटांच्या दाटीवाटीच्या, छोट्या जागेत आयुष्य जगल्यावर या चाळकऱ्यांनी ५०० चौरस फूट, दोन बेडरूमच्या सदनिकेत प्रवेश केला, ही त्यांच्या आयुष्यातली समाधानाची बाब आहे. बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाच्या प्रकल्पाची सर्वप्रथम १९९६ मध्ये चर्चा सुरू झाली. तेव्हापासून हा प्रश्न रखडला होता. २०१६ मध्ये त्याला चालना मिळाली. २०२१मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या प्रकल्पाचे भूमिपूजन केले. त्यानंतर चारच वर्षांत ५४६ घरे हस्तांतरित करण्यात आली. बीडीडीच्या चाळींची संख्या पाहता हे प्रमाण अल्प आहे. शहरात वरळी, नायगाव आणि ना. म. जोशी मार्ग (डिलाइड रोड) या परिसरात तीन ठिकाणच्या एकूण २०७ बीडीडी चाळींमध्ये एकूण १५ हजार ५९३ खोल्या आहेत.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला मुंबईत मिल, बंदरांवर काम करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कामगारांची गरज होती. या कामगारांच्या निवासासाठी १९२० आणि १९२५ मध्ये तत्कालीन बॉम्बे डेव्हलपमेंट डिपार्टमेंट (बीडीडी) ने या चाळींचे बांधकाम केले. त्यांची रचना कारावासासारखी होती. स्वातंत्र्यसैनिकांसाठी हे तुरुंग म्हणून बांधण्यात आल्याच्याही नोंदी आहेत. मात्र त्यांचा वापर प्रामुख्याने गिरणी कामगारांचे, पोलिसांचे निवासस्थान म्हणून करण्यात येत होता. या चाळी सर्व जिल्ह्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या होत्या. ग्रामीण भागातील जातव्यवस्था, प्रांतव्यवस्था मुंबईतदेखील या चाळींनी घट्ट बांधून ठेवली होती. पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे इथपासून कोकणातील रत्नागिरीपासून तळकोकणापर्यंतचे लोक आपापल्या जातसमूहासह एकत्रित राहत होते.

**'कष्टकऱ्यांची मुंबई'**

ना. म. जोशी मार्गावरील बीडीडी चाळींमध्ये एका इमारतीत कोकणातील मराठा समाज, दुसऱ्या इमारतीत कोल्हापूर पट्ट्यातील मराठा समाज, तर तिसऱ्या इमारतीत चर्मकार, बौद्ध अशी रचना दिसून येते. मागील चार, पाच पिढ्या या इमारती जातींची मूळे तशीच घट्ट पकडून आहेत. १९७४मध्ये झालेली वरळीच्या जातीय दंगलीची पाळेमुळे यात सापडतात. 'कष्टकऱ्यांची मुंबई' हे बिरुद मुंबईला बीडीडींमुळे मिळाले.

कामगारांना राहण्यासाठी म्हणून ब्रिटिशांनी या चाळींचे घाईघाईत बांधकाम केले होते. स्वातंत्र्यपूर्व काळात जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मध्ये आर्किटेक्चरचे प्राध्यापक असलेले क्लॉड बॅटली यांनी २३ ऑक्टोबर १९४४ रोजी 'इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स' संस्थेतील भाषणात सांगितले, की मुंबईतील बीडीडी चाळींनी येथील मोकळ्या आणि विस्तीर्ण आकाशाला जणू कलंकित केले आहे. हवेची नैसर्गिक झुळूक आणि सुखद हिरवाईला यामुळे बट्टा लागला आहे. परमेश्वराने दिलेल्या या अमूल्य देणगीला काँक्रिटच्या या उद्योगाने पूर्णत: कलंकित केले आहे. बीडीडी चाळी म्हणजे (मुंबईचा कलंक) असे बॅटलींनी म्हटले होते. उजेड असलेली हवेशीर घरे, मोकळी उद्याने, चांगले पदपथ, रुंद रस्ते हे नागरिकांचे अधिकार आहेत. त्यांनी अशा कोंडवाडासदृश्य घरांमध्ये निवारा करावा हे अमानवी आहे, असे बॅटली यांचे मत होते.

शंभर वर्षांपूर्वीच्या बीडीडीच्या घरांच्या स्थापत्य शास्त्रावर तत्कालीन स्थापत्यशास्त्रज्ञांनी आक्षेप घेतला होता. मात्र शंभर वर्षांनंतरदेखील आपण त्यामध्ये बदल करू शकलेलो नाही. या घरांमध्ये हाडामांसाची माणसे राहणार आहेत याचा विचार शंभर वर्षांपूर्वी ब्रिटिशांनी केला नव्हता, परंतु आज २१ व्या शतकात उभ्या केलेल्या इमारती बांधतानाही हा विचार केलेला दिसत नाही. मुंबईत निम्नवर्गासाठी उभी राहणाऱ्या इमारती या अंधारी घरेच आहेत. राज्य सरकारने नुकतेच महाराष्ट्राचे नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर केले आहे. त्यानुसार मुंबईत ५२ टक्के लोकसंख्या ही झोपडपट्ट्यांमध्ये राहत असल्याचे म्हटले आहे. प्रामुख्याने कष्टकरी, मजूरवर्ग या झोपटपट्ट्यांमध्ये राहतो. त्यांच्या वाटेला बीडीडी किंवा एसआरए बांधत असलेले कोंडवडे येवू नयेत.

**चाव्या सुपूर्द करताना...**

बीडीडी चाळींच्या पुनर्वसनात चाळकऱ्यांना ५०० चौरस फुटाची सदनिका आणि १२ वर्षांसाठी देखभाल शुल्कात संपूर्ण सूट देण्यात आली आहे. या नव्या सदनिकांचे भाव आज कोटींच्या घरात आहेत. म्हणूनच रहिवाशांना चाव्या सुपूर्द करताना 'ही सोन्यासारखी घरे विकू नका' असे आवाहन खुद्द राज्याच्या मुख्यमंत्र्यांना करावे लागले आहे. आर्थिकदृष्ट्या ही कोंडी फुटली असली तरी भविष्यात तेथील सामाजिक संतुलन राखले जाणार आहे का, हा प्रश्न आहे. बीडीडीच्या पुनर्वसनाचे उभे राहणारे बहुमजली टॉवर आणि त्याच्या शेजारी उभे राहणारे आलिशान संकुल एकमेकांशी सामाजिक-भावनिकरीत्या जोडले जातील का?

वरळी, नायगाव, शिवडी आणि लोअर परळ भागात बीडीडीच्या एकूण ९०.८२ एकर जागेपैकी ५९.०३ एकर परिसरात चाळकऱ्यांसाठी घरे बांधण्यात येणार आहे. तर ३१.७९ एकर जमीन विकासकांसाठी खुल्या बाजारात विक्रीयोग्य निवासी आणि कमर्शियल प्रकल्प बांधण्यासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. उदाहरणार्थ, वरळीच्या पहिल्या टप्प्यात विकसक निवासी टॉवर्ससह एक लाख ८० हजार चौरस मीटरचे व्यावसायिक संकुल बांधू शकतात. या विक्रीतून त्यांना अब्जावधींचा महसूल मिळण्याची शक्यता आहे. चाळकऱ्यांच्या पुनर्वसनातून मोकळ्या झालेल्या जमिनीतून २० ते ३० टक्क्यांपेक्षा अधिक नफा विकसकाला होणार आहे. आतापर्यंत बीडीडीच्या जमिनीवर केवळ १५ ते २० हजार घरे होती, त्याच्या कितीतरी पटींनी अधिक घरे आणि व्यापारी संकुले आता येथे उभी राहणार आहेत. ही संख्या ५० हजार ते एक लाख घरांपर्यंतही जाऊ शकेल, असा एक अंदाज आहे. साहजिक यापुढे या परिसरात जल, वायूपासून मलनिस्सारण व्यवस्थेपर्यंतच्या व्यवस्थेवर येणारा ताण हा पुढील काळात शहराला गुदमरवणारा असेल. मुंबईतील वाहतूक कोंडी आणि बकालपणा पाहता शहर नियोजनाच्या दृष्टीने आकार देण्याची प्रत्येक संधी त्या त्या वेळच्या राज्य सरकारांनी (प्रामुख्याने नगरविकास विभागाने) आणि महापालिकांनी गमावली आहे. गिरण्यांच्या जमिनीचा विकास असो वा आताच्या बीडीडीच्या जागेवर घरे बांधण्याचा प्रकल्पातून प्रकर्षाने दिसून येते.

मुंबईत पुनर्वसन प्रकल्प म्हणजे मोकळी उपलब्ध होणारी मुबलक जमीन, असेच जणू विकसकांना वाटत असावे, असे दिसते. त्या जमिनीवर उभ्या राहणाऱ्या इमारतीतील माणसांना हवा, पाण्यासोबत मोकळे आकाश पाहण्याचीसुद्धा गरज असते, याचा विचारच झालेला नसतो. नगरविकास करताना नागरी सुविधांसोबत सार्वजनिक आरोग्याच्या सुविधादेखील उपलब्ध करून द्यायच्या असतात. त्याचा तर या पुनर्वसन प्रकल्पांमध्ये विचार होत नाही. विकसक प्रकल्प रेटण्याच्या प्रयत्नात असतात. उंच इमारती बांधून मोठा नफा कमावणे हे त्यांचे ध्येय असते. पण सरकारने तरी त्यांचे भागीदार होऊ नये. झोपडपट्टी आणि चाळींच्या कोंदट वातावरणात जगणाऱ्या लाखो मुंबईकरांना त्यांच्या हक्काचा निवारा देताना जमीन, प्रकाश आणि आकाश मिळावे, हीच किमान अपेक्षा असते. शहर नियोजन आणि विकास म्हणजे सिमेंटची उभी जंगले नव्हेत याचा विचार होण्याची आवश्यकता आहे.

### सांस्कृतिक ओळख

विसाव्या शतकाच्या मध्यावर राज्याच्या ग्रामीण भागातून रोजगाराच्या शोधात आपल्या कुणातरी नातलगाचे बोट धरून मुंबईत येणाऱ्यांसाठी बीडीडी चाळी हक्काची जागा होती. चाळींमधील 'सड्यागड्यांची खोली' किंवा 'झिलग्यांची खोली' असायची, ज्यात फक्त गावाहून आलेली पुरुषमंडळी राहत. रोजगार शोधण्यासाठी आलेल्या अनेकांचा प्रवास याच खोल्यांतून सुरू झाला. या चाळींनी मुंबईच्या राजकीय, सांस्कृतिक, कला आणि क्रीडा क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. आज मुंबईची ओळख ठरलेला गणेशोत्सव असो की दहीहंडी, याच चाळींमध्ये जोपासला गेला. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गिरणी कामगारांचे मोर्चे यांत इथला कामगार वर्ग प्रथम रस्त्यावर उतरला होता. या चाळींनीच कबड्डी या खेळाला जिवंत ठेवले.

---

# 'लहान मुलांच्या भविष्याचा विचार करा'



मेलानिया ट्रम्प

वॉशिंग्टन, ता. १७ (पीटीआय) : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादीमिर पुतीन यांच्यातील चर्चेतून ठोस निर्णय झाला नसला तरी या बैठकीवेळी युक्रेनमध्ये शांतता निर्माण भावनिक आवाहनही करण्यात आले आहे. हे आवाहन ट्रम्प यांच्या पत्नी मेलानिया यांनी पुतीन यांना पत्राद्वारे केले होते.

ट्रम्प यांनी मागील आठवड्यात पुतीन यांची भेट घेत चर्चा केली. यावेळी मेलानिया यांनी पुतीन यांना ट्रम्प यांच्या हस्ते पाठविले होते. 'व्हाइट हाऊस'मध्ये या पत्राची आणि त्यातील मजकुराची नोंद झाली आहे. या पत्रात मेलानिया यांनी युक्रेनचा थेट उल्लेख केला नसला तरी, भौगोलिक महत्त्वाकांक्षा, सरकार आणि विचारसरणी यांच्याहून अधिक महत्त्व बालके आणि त्यांच्या भविष्याला आहे याचा विचार करावा, असे आवाहन पत्रात करण्यात आले आहे.

# एल्विश यादवच्या घराबाहेर गोळीबार

नवी दिल्ली, ता. १७ : वादग्रस्त यूट्युबर एल्विश यादव याच्या गुरुग्राम येथील निवासस्थानाबाहेर अज्ञात हल्लेखोरांनी रविवारी (ता. १७) गोळीबार केला.

पोलिसांच्या माहितीनुसार, पहाटे ५.३० ते ६ वाजण्याच्या दरम्यान हा प्रकार घडला. तीन जण दुचाकीवरून आले आणि यादव याच्या 'सेक्टर ५७' येथील घरावर दोन डझनपेक्षा जास्त गोळ्या झाडल्या. ते घटनास्थळावरून पसार झाले. गोळ्या तळमजल्यावर आणि पहिल्या मजल्यावर लागल्या. एल्विश यादव दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर राहतो. मात्र, घटनेच्या वेळी तो घरी नव्हता. गुरुग्रामचे पोलिस अधिकारी संदीपकुमार यांनी या घटनेची माहिती दिली. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज मिळाले असून, दुचाकीवरून आलेल्या दोघांनी गोळीबार केल्याचे दिसत आहे. या फुटेजवरून पोलिस हल्लेखोरांचा शोध घेत आहेत.

**टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड**
TATA AIG INSURANCE WITH YOU ALWAYS
नोंदणीकृत कार्यालय: पेनिन्सुला बिझनेस पार्क, टॉवर ए, १५ वा मजला, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३
दूर.: ०२२-६६६९९७६१
ई-मेल: secretarialdepartment.tataaig@tataaig.com
वेबसाइट: www.tataaig.com | सीआयएन: U85110MH2000PLC128425

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीद्वारे जारी केलेल्या व २७ सप्टेंबर २०३३ रोजी विमोचनयोग्य असलेल्या असुरक्षित, अधीनस्थ, सूचीबद्ध, विमोचनयोग्य, करपात्र, बिगरपरीवर्तनीय पूर्णत: प्रदानित डिबेंचर्सवर २७ सप्टेंबर २०२५ रोजी देय असलेल्या ८.१५ टक्के (८.१५%) दराने वार्षिक व्याज मिळविण्यास पात्र असलेल्या कंपनीच्या डिबेंचरधारकांच्या पात्रतेच्या निश्चितीसाठी १२ सप्टेंबर २०२५ ही नोंद दिनांक म्हणून निश्चित करण्यात आली आहे.

डिबेंचरधारकांना विनंती करत आहोत की त्यांनी डिबेंचरवरील व्याज आणि पत्त्यातील बदलाबाबत भविष्यातील सर्व पत्रव्यवहार, कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट, एनएसडीएल डेटाबेस मॅनेजमेंट लिमिटेड यांना पाठवावा, ज्यामध्ये डिबेंचरधारकांचे पूर्ण नाव, पत्ता, क्लायंट आयडी आणि लागू असल्यास डीपी आयडी नमूद करावा.

**टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडसाठी**
**सही/-**
**हनोझ चिनॉय**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**
**मेंबरशिप क्रमांक ACS 21435**

**ठिकाण: मुंबई**
**दिनांक: १८ ऑगस्ट, २०२५**

---

# ...अन्यथा माफी मागा

पान १ वरून

निवडणूक आयोग आपले घटनात्मक कर्तव्य बजावण्यापासून परावृत्त होणार नाही. मागील दोन दशकांपासून मतदारयाद्यांमध्ये सुधारणा करण्याचा कार्यक्रम सुरू आहे. बिहारची सखोल पडताळणी (एसआयआर) हा त्याचाच एक भाग आहे. निवडणुकीच्या तोंडावर पडताळणी केली जात असल्याच्या आरोपात तथ्य नाही. निधन पावलेल्या, कायमस्वरूपी वास्तव्य सोडलेल्या आणि अपात्र लोकांची नावे वगळण्यासोबत पात्र आणि नवीन उमेदवारांची नावे समाविष्ट करण्यासाठी 'एसआयआर'ची मोहीम हाती घेण्यात आली आहे.''

**अजूनही १५ दिवस आहेत...**

''बिहारच्या 'एसआयआर' मोहिमेदरम्यान ज्या लोकांनी काही आक्षेप घेतले आहेत, त्रुटी निदर्शनास आणण्यात आणून दिल्या आहेत. त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी १ सप्टेंबरपर्यंतचा कालावधी देण्यात आला आहे. अद्याप एकाही राष्ट्रीय अथवा राज्यस्तरीय पक्षाने मतदारयादीतील चूक पुराव्यांसह निदर्शनास आणून दिलेली नाही. १ सप्टेंबरनंतर आक्षेपांचा विचार होणार नाही,'' असे मुख्य निवडणूक आयुक्तांनी स्पष्ट केले.

**'आयोगाच्या खांद्यावर बंदूक का?'**

निवडणूक आयोगाच्या खांद्यावर बंदूक ठेवून मतदारांना लक्ष्य बनवत राजकारण केले जात असल्याचा आरोप ज्ञानेश कुमार यांनी केला. ते म्हणाले, ''कोणत्याही निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर काही आक्षेप असतील तर संबंधित लोक अथवा पक्ष ४५ दिवसांच्या आत उच्च न्यायालयात दाद मागू शकतात. केरळ, कर्नाटक अथवा अन्य राज्ये असोत, ४५ दिवसांत कोणतेही अपील करण्यात आले नाही. आता इतक्या दिवसानंतर आरोपांवर आरोप केले जात आहेत याचा अर्थ लोकांना बरोबर समजतो.''

# उपराष्ट्रपतिपदासाठी सी. पी. राधाकृष्णन

पान १ वरून

आरिफ मोहम्मद खान, कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गहलोत, सिक्कीमचे राज्यपाल ओमप्रकाश माथूर, जम्मू कश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, रा. स्व. संघाचे कार्यकर्ते शेषाद्री चारी, राज्यसभेचे विद्यमान उपसभापती हरिवंश यांच्या नावांचीही चर्चा झाल्याचे समजते. दोन्ही सभागृहांमधील सत्ताधाऱ्यांचे संख्याबळ पाहता निवडणूक झाली तरी राधाकृष्णन यांना विजय मिळविणे अवघड जाणार नाही, असे सूत्रांचे म्हणणे आहे. विरोधी इंडिया आघाडीने उमेदवार उभा केल्यास ९ सप्टेंबर रोजी मतदान होईल.

'एनडीए'चे उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांनी नेहमीच वंचित घटकांच्या सबलीकरणावर भर दिला आहे. त्याग, नम्र स्वभाव आणि बुद्धिमत्ता यांच्या जोरावर त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. राधाकृष्णन यांनी तमिळनाडूत तळागाळातील घटकांसाठी मुलभूत स्वरूपाचे केलेले काम उल्लेखनीय आहे.

- नरेंद्र मोदी, पंतप्रधान

# मुसळधारेचा अंदाज

पान १ वरून

मुंबईतील सांताक्रूझ येथे सर्वाधिक २५० मिलिमीटर, रत्नागिरीच्या सावर्डे २३० मिमी, चिपळूण येथे २२० मिमी आणि जळगावच्या दहीगाव येथे रविवारी (ता. १७) सकाळपर्यंतच्या २४ तासांमध्ये २०० मिमी पावसाची नोंद झाली. उद्या (ता. १८) कोकण, घाटमाथ्यावर मुसळधार पावसाचा अंदाज असल्याने रायगड, रत्नागिरी, पुणे घाटमाथा, सातारा घाटमाथा, कोल्हापूर जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर सावधानतेचा इशारा (रेड अलर्ट) देण्यात आला आहे.

## हवामान विभागाचा इशारा

- **मुसळधार पावसाचा इशारा (रेड अलर्ट)**
  रायगड, रत्नागिरी, पुणे घाटमाथा, सातारा घाटमाथा, कोल्हापूर घाटमाथा.
- **अतिजोरदार पावसाचा इशारा (ऑरेंज अलर्ट)**
  पालघर, ठाणे, मुंबई, सिंधुदुर्ग, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली.
- **जोरदार पावसाचा इशारा (यलो अलर्ट)**
  नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सोलापूर, धाराशिव, परभणी, हिंगोली, नांदेड, अकोला, नागपूर, भंडारा, गोंदिया.
- **विजांसह पावसाचा इशारा (यलो अलर्ट)**
  नंदुरबार, बुलडाणा, वाशीम, वर्धा, यवतमाळ.

# ...३२ बगळ्यांचा मृत्यू

पान १ वरून

बगळ्यांचे पाय मोडले आहेत. या बगळ्यांवर काल रात्री महाड येथे पक्षिमित्रांकडून उपचार करण्यात आले. हा काळ बगळ्यांसाठी महत्त्वाचा असल्याने बगळ्यांचे वास्तव्य असलेली झाडे तोडू नयेत, असे आवाहन पक्षितज्ज्ञ व मानद वनरक्षक प्रेमसागर मेस्त्री यांनी केले आहे.

**पक्षिमित्रांची धाव**

घटना कळताच नगरपालिकेचे अग्निशमन दल तसेच महाड येथील पक्षितज्ज्ञ प्रेमसागर मेस्त्री आणि गणेश खातू, अंजय धनावडे, ओम शिंदे, तुषार चव्हाण, सौरभ शेठ, समीर विचारे, संकेत सकपाळ, पराग वडके, पंकज उमासर अशा पक्षिमित्रांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी या ठिकाणी तत्काळ धाव घेत बचावाचे प्रयत्न सुरू केले. पुणे येथून रविवारी (ता. १७) सकाळी आलेल्या रेस्क्यू केंद्राच्या गाडीमधून हे १८ पक्षी पुढील उपचारासाठी वन विभागाच्या सहकार्याने पुणे येथे पाठवण्यात आले. नगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या सहकार्याने ओम शिंदे याने झाडांवर चढत पक्षांसाठी घरट्यांची तात्पुरती सोय केली आहे.

**पश्चिम रेल्वे**
**उच्च क्षमता IV कपलर आणि फीडर केबल्सची तरतूद**
डे.चीफ इलेक्ट्रिकल इंजिनिअर (W), पश्चिम रेल्वे, कॅरेज रिपेअर वर्कशॉप, एन.एम. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३ हे **ई-निविदा सूचना क्र. : EL/WA/PL/2024-25/46R दिनांक : १२-०८-२०२५ मागवित आहेत. कामाचे नाव :** दरांचे वेळापत्रक आणि कामाच्या व्याप्तीनुसार कॅरेज रिपेअर वर्कशॉप, लोअर परेल येथे LHB AC कोचेससाठी उच्च क्षमता IV कपलर (500Amp) आणि 150 Sq.mm फीडर केबल्सची तरतूद. **कामाची अंदाजे किंमत : ₹ ४,४९,११,७४२.२०. बयाणा रक्कम : ₹ ३,७४,६००/-. निविदा सादरीकरणाचा अंतिम दिनांक आणि वेळ : ०९-०९-२०२५** रोजी १२.०० वाजेपर्यंत. **निविदा उघडणे :** ०९-०९-२०२५ रोजी १२.३० वा. संबंधित तपशिलासाठी कृपया आमचे संकेतस्थळ : **www.ireps.gov.in** येथे भेट द्या. 0493
लाईक करा : facebook.com/WesternRly